सिंधुदुर्ग बँक
सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
SINDHUDURG BANK

# सुरक्षा कवच मुदत ठेव योजना

*सुरक्षीत जीवनासाठी... जीवनानंतरच्या सुरक्षीततेसाठी !*

नमस्कार,

सन्माननीय ग्राहक बंधु आणि भगिनींनो,

आपणा सर्वांचे जीवन हे खुपच धावपळीचे झाले आहे. आपल्या वाढणाऱ्या गरजा आणि त्या पूर्ण करण्यासाठी होणारी धावपळ यातून आपले जीवन असुरक्षित झाले आहे. अशा या धावपळीच्या युगात अपघात, दुर्धर व्याधी यातून जीवाला धोका निर्माण झाल्यास आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी विम्याचे संरक्षण असणे अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक सक्षम असलेली कुटुंबे आपला विमा प्रतीवर्षी उतरवित असतात. परंतु सर्वसामान्य माणसाला प्रतिवर्षी अशा विम्यासाठी रक्कम उभी करणे शक्य नसते. त्यावेळी शासनाने सुरू केलेल्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना या छोटा विमा हप्ता असलेल्या योजनांचा फायदा घेऊन आपल्या कुटुंबाची आर्थिक सुरक्षितता जपणे आवश्यक आहे. विम्याचा हप्ता नियमित भरणे बऱ्याच वेळा शक्य होत नाही तसेच विमा पॉलिसीचे नुतनीकरण करताना काही विमाधारकांच्या बचतखाती पुरेशी रक्कम नसल्यामुळे विम्याचे नुतनीकरण होऊ शकत नाही. त्यामुळे विमा पॉलिसी खंडीत होते व विमाधारकाचा मृत्यू/ अपघात झाल्यास नुकसान भरपाई मिळत नाही. ही बाब लक्षात घेऊन बँकेने सामाजिक बांधीलकी जपत वरील योजनांच्या नुतनीकरणासाठी 'सुरक्षा कवच मुदत ठेव योजना' कार्यान्वीत केली आहे.

या योजने अंतर्गत एक रक्कमी रू. ५०००/- मुदत ठेवीमध्ये गुंतविल्यास ठेवीदाराला मिळणाऱ्या व्याजातून प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजने अंतर्गत विमा पॉलिसीसाठी निश्चित असलेल्या १८ ते ५० वर्षे वयोमर्यादिपर्यंत सहभाग घेता येणार आहे. विमा नुतनीकरणासाठी प्रिमियमची रक्कम त्याच्या ठेव व्याजामधुन बँक वर्ग करणार आहे. यात अपघाती मृत्यू झाल्यास रक्कम रू. २ लाख पर्यंतचे विमा संरक्षण मिळणार आहे.

तर एक रक्कमी रू. २००/- मुदत ठेवीमध्ये गुंतविल्यास वयाच्या १८ ते ७० व्या वर्षापर्यंत सुरक्षा विमा योजने अंतर्गत विमा योजनेचे ठेव व्याज रक्कमेतून नूतनीकरण होणार आहे. यात अपघाती मृत्यू झाल्यास रक्कम रू. २ लाख पर्यंतचे विमा संरक्षण मिळणार आहे. ही योजना जिल्हा बँकेकडून कर्ज घेणाऱ्या सर्व ग्राहकांसाठी सक्तीची केलेली आहे.

सदरच्या दोन्ही विमा योजना ह्या केंद्र शासनाच्या असून त्याची अंमलबजावणी बँकेमार्फत केली जाते. त्यामुळे शासनाकडून जोपर्यंत या विमा योजना चालु राहतील तो पर्यंत या मुदत ठेवींच्या व्याज रक्कमेतून संबंधित ग्राहकाची विमा प्रिमियमची रक्कम भरणा केली जाईल. शासनाकडून विमा योजना खंडीत झाल्यास अगर विमा योजनेत बदल झाल्यास ग्राहकाच्या मुदत ठेवीच्या व्याजाची रक्कम त्याच्या सेव्हिंग खात्यात वर्ग केली जाईल.

बँकेने चालु केलेल्या या 'सुरक्षा कवच मुदत ठेव योजनांमुळे' सर्वसामान्य लोकांना सुरक्षा कवच प्राप्त होणार असून बँकेच्या या सुरक्षा कवच मुदत ठेव योजनेमध्ये जास्तीत जास्त ग्राहकांनी सहभागी व्हावे असे आवाहन मी आपणा सर्वांना करीत आहे. सुरक्षीत जीवनासाठी... जीवनानंतरच्या सुरक्षीततेसाठी आजच या योजनेत आपण सहभागी व्हा, ही विनंती.

विमा हप्त्याची रक्कम ही एकदाच भरा.

विमा योजना केंद्रशासन पुरस्कृत असून ती पुर्णतः केंद्रशासनाच्या नियमाधीन आहेत.

**बँकेच्या नजिकच्या शाखेशी आजच संपर्क साधा.**



आपला
**सतीश सावंत**
अध्यक्ष, सिंधुदुर्ग बँक